**<u>नियमित दिवाणी दावा क्रमांक ९८९/२०१८ मधील नि.६१ वरील आदेश</u>**

*<u>(सखाराम यशवंत बर्डे व इतर **विरुध्द** दत्तु किसन बर्डे व इतर)</u>*

वादी नं.१ ब यांनी प्रस्तूतचा अर्ज हा प्रतिवादी क्र.६ यांचे वारस रेकॉर्डवर घेणेस झालेला उशीर माफ होवुन मिळण्यासाठी केलेला आहे.

०२. वादी नं.१ ब यांनी प्रस्तूत अर्जान्वये असे कथन केले आहे की, वादी यांनी दावा वाटप व मनाईचे कामी दाखल केलेला असुन सदरचे दाव्याचे कामकाज चालु असतांना प्रतिवादी नं. ६ हे दिनांक ०२/०१/२०१९ रोजी मयत झालेले असुन त्यांचे वारस रेकॉर्डवर घेणेकामी जाणीवपुर्वक उशीर केला असे घडलेला नाही, वादीने वारस रेकॉर्डवर घेण्याबाबत वादीचे वकिलांनी वेळेत सुचना दिल्या नाही. तसा वादींचा मालाफाईड हेतु देखील नव्हता. परंतु, सदरचा अर्ज प्रतिवादी नं.६ चे मृत्यूनंतर ६ वर्षे १ महिना १७ दिवस वारस रेकॉर्डवर घेणेकामी उशीर झालेला आहे. सबब, प्रतिवदी नं.६ चे वारस रेकॉर्डवर घेणेकामी झालेला उशीर माफ करण्यात येवुन वारस रेकॉर्डवर घेण्याची परवानगी असावी अशी विनंती केली आहे.

०३. सदर अर्जावर प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले. त्यांचे म्हणणे थोडक्यात असे की, अर्ज खरा व बरोबर नाही, प्रतिवादी यांना मान्य नाही, वादी यांनी जाणूनबुजून उशी केलेला आहे. सबब, सदरचा अर्ज मंजुर केल्यास कॉस्टचा हुकूम करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०४. वादी व प्रतिवादी यांच्या विधीज्ञांना युक्तिवाद ऐकला. प्रतिवादी नं.६ चे वारस विहीत मुदतीमध्ये अभिलेखावर दाखल करणे आवश्यक होते परंतू वादीचे वकिलांनी वेळेत सुचना दिल्या नाही म्हणुन प्रतिवादी नं.६ चे वारस अभिलेखावर दाखल करणेस विलंब झालेला आहे. परंतु, प्रतिवादी नं. ६ चे वारस अभिलेखावर घेणे हे दावा गुणदोषावर चालविणेचे कामी अनिवार्य आहे. सबब, प्रतिवादी यांनी सदर अर्ज खर्चासह मंजुर करण्यास हरकत नसल्याचे देखील नमुद केल्याने वादी यांना झालेला विलंब खर्चासह माफ करण्यात येतो. सबब, खालील प्रमाणे आदेश करण्यात येतोः–

**<u>आदेश</u>**

१. अर्ज (**नि.६१**) खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. वादी नं.१ ब यांनी प्रतिवादींना रक्कम रु.५००/– खर्च द्यावा.

३. वादी व प्रतिवादी यांनी नोंद घ्यावी.

स्वाक्षरीत/-

संगमनेर. (श्रीमती एस. बी. ढवळे)

दि.१०/०३/२०२५. सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, संगमनेर.